International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.9 Issue. 3 Jan-Feb-2022

# राजर्षी शाहू पूर्वकाळातील कोल्हापूर राज्यातील उद्योगधंदे

**डॉ. खंडेराव शिंदे**
इतिहास विभाग, राजर्षी शाहू कला व वाणिज्य महाविद्यालय, रुकडी

**प्रास्ताविक –**

छत्रपती शिवाजी महाराजानी स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्याचे आठराव्या शतकाच्या पहिल्या दशकात महाराणी ताराबाई व छत्रपती शाहू महाराज यांच्यातील संघर्षातून सातारा व कोल्हापूर अशी दोन राज्ये निर्माण झाली. महाराणी ताराबाईंनी सन १७१० मध्ये कोल्हापूर राज्याची स्थापना केली. कोल्हापूर राज्य हे दक्षिण संस्थानातील सर्वात मोठे राज्य होते. असे हे कोल्हापूर राज्य कृषिप्रधान असले तरी एकोणिसाव्या शतकामध्ये राज्यात उद्योगधंद्याचा बराच विकास झाला होता. राज्यात उद्योगधंद्यांना शेतीइतकेच महत्व होते. उद्योगधंद्यांसाठी लागणारी परिस्थीती तसेच कच्चा माल, कुशल कामगार, वाहतुकीच्या सोयी, इ. गोष्टी अनुकूल होत्या. या राज्याच्या सन १८८३ ते १८९४ या आकरा वर्षाच्या कालखंडातील उद्योगधंद्यावर फारसे कोणी संशोधन केले नाही. ढोबळ मानाने आजचा पुर्ण कोल्हापूर जिल्हा आणि कर्नाटकातील रायबाग तालुका यांचा समावेश कोल्हापूर राज्यात होत होता. अशा या कोल्हापूर राज्यात राजर्षी शाहूंच्या राज्यभिषेकागोदर अनेक उद्योगधंदे चालत. या उद्योगधंद्याची तुलना आजच्या औद्योगिककरणाबरोबर होत नसली तरी हे उद्योग राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा होता. या उद्योगधंद्याचा कोल्हापूर राज्याचा आर्थिक विकासावर चांगला परिणाम झाला होता. राजर्षी शाहू महाराजांच्या काळात कोल्हापूर राज्याची औद्योगिक प्रगती फार मोठ्या प्रमाणावर झाली. कारण राजर्षी शाहूंनी या क्षेत्राकडे विशेष लक्ष्य दिले होते. यामुळे लोकांना रोजगार उपलब्ध झाला. कोल्हापूर राज्याची आर्थिक प्रगती करुन घेण्यासाठी उद्योगधंद्यांची वाढ महत्वाची होती याची जाणिव शाहू महाराजांना झाली होती. पण त्यांच्या राज्याभिषेकापूर्वी कोल्हापूर राज्यात कोण-कोणते उद्योग चालत होते याचा शोध घेण्याच्या दृष्टीने येथे प्रयत्न केला आहे. कोल्हापूर राज्यात सन १८९४ च्या दरम्यान कुटीर उद्योग मोठ्या प्रमाणात चालत. काही शहरी व्यवसाय ग्रामीण व्यवसायावर आधारीत होते. स्वावलंबन हे ग्रामीण व्यवसायाचे ध्येय होते. शेती हा ग्रामीण भागात मुख्य व्यवसाय असल्याने त्यावर आधारित अनेक व्यवसाय चालत. गावातील कारागीर

लोकांच्या गरजा भागवित. कारागिरांचे स्थलांतर होऊ नये म्हणून गावकरी व वतनदार लोक काळजी घेत. कोल्हापूर राज्यात खालील उद्योगधंदे चालत होते.

**सोन्या-रुप्याचे काम –**

कोल्हापूर राज्यात सन १८८३ च्या सुमारस सोनाराची १२०० कुटुंबे होती . यापैकी ४०० कुटुंबे सोनार काम करुन शेती करत होते. मोठ्या बाजाराच्या गावी किंवा मोठ्या खेड्यात सोनारकाम चाले. रुप्याच्या कामास दर तोळयास पाऊण आण्यापासून चार आण्यापर्यंत मजुरी मिळत होती.[1] सन १८९४ मध्ये कोल्हापूर शहरात सोनाराची ९ ६ दुकाने होती.

**तांबट काम- ( जुनी भांडी दुरुस्त करणारे )**

कोल्हापूर राज्यात तांबटांची सन १८८३ च्या सुमाराला ७० कुटुंबे होती. यांच्या धंद्याला २० ते ५० रुपयांची हत्यारे लागत. तांबट दिवसाला ७-८ आणे मिळवत. सन १८ ९ ४ मध्ये राज्यात फक्त २८ तांबट लोक होते. त्यांची १८ दुकाने असून त्यांत ४४ कामगार काम करीत होते.

**कुंभारकाम –**

कोल्हापूर राज्यात सन १८९४ च्या सुमारास १,०५५ कुंभाराच्या भट्टया होत्या. या भट्टयांमध्ये ३,३१२ कामगार काम करीत. साधनसामग्री खरेदीसाठी एकूण ३,८०५ / - रुपये भांडवल गुंतवले होते. कच्चा माल व सरपण यावर २१,७७५ / - रु. खर्च केला होता. एका वर्षात १,१५,१७८ / - रुपये किंमतीचा पक्का माल तयार केला होता. राज्यात २६१ ठिकाणी कुंभारकाम चालत होते. पन्हाळा, भुदरगड व गडहिंग्लज तालुक्यातील माती कुंभारकामासाठी चांगली होती. गडहिंग्लज व शेणगाव येथिल माती विटांसाठी चांगली होती.[2]

**बांगडी उद्योग –**

बांगड्या तयार करण्याचा उद्योग पाडळी, फेजिवडे, गारगोटी, तासगाव, हत्तीगाव, वाकुर्डे व घोनसारी येथे चालत होता. गारगोटी येथिल बांगडी उत्तम प्रतीची होती. या बांगड्या मणेर किंवा कासार लोक

विकत घेत. पण मुंबई, पुणे, मिरज याठिकाणाहून कोल्हापूर राज्यात उच्च प्रतीच्या बांगड्या येऊ लागल्याने या धंद्यास फारसी तेजी नव्हती.

**सुतार व लाख काम –**

कोल्हापूर राज्यात ५६७ ठिकाणी सुतारकाम चालत होते. यामध्ये २,४५९ कामगार काम करत. पाटगाव येथे उत्तम लाकडी पाळणे तयार केले जात. भुदरगड तालुक्यातील पाटगाव व शिवडाव येथे लाखकाम मोठ्या प्रमाणावर चाले. कोल्हापूर, शिरोळ व चिंचली येथेही लाखकाम चाले.[3]

**चर्मोद्योग –**

कोल्हापूर राज्यात कातडी कमावण्याचा उद्योग २९ ठिकाणी चालत होता. कातडी कमाविण्याची १३४ कुंडे होती. वर्षाला २९,७३१ रुपये किंमतीचे कातडे तयार केले जाई. हा व्यवसाय ढोर जातीचे लोक करत. कातडे कमाविल्यानंतरच ते चामडी वस्तू तयार करण्यासाठी योग्य होत असे. कोल्हापूर राज्यात १,२५९ ठिकाणी चांभारकाम चाले. या उद्योगात २,०५५ कामगार काम करीत. जोडे, चप्पल, मोटा, पखाली अशा कातडी वस्तू चांभार बनवित. अळते पेटयातील चांभार घोड्याचे लगाम व घोड्याचा संरजाम तयार करीत.[4]

**विणकाम उद्योग –**

**सुती विणकाम**

कोल्हापूर राज्यात सन १८९४ च्या सुमारास ३,०३२ हातमाग होते. विणकर सुती तयार कापड शेजारच्या बाजारपेठेत विकत व तेथून कच्चा माल खरेदी करत. विणकाम केल्यावर विणकारास एक रुपयांमागे अर्धा किंवा एक आणा नफा मिळत होता. मोमीन लोक यंत्री सुताचा उपयोग कापड विणण्यासाठी करत. रंगित सुतापासून लुगडी तयार केली जात. कोष्टी लोक दरमहा १५ रुपयापासून ३५ रुपयांपर्यत नफा मिळवत. कोल्हापूरच्या मध्यवर्ती तुरुंगात १७ हातमाग होते त्यात हात पुसण्याचे जाड टावेल, टेबलावरील जाड कापड तयार केले जाई. विलायती कापड येवू लागल्यापासून राज्यातील

हातमागाची संख्या कमी होत गेली. कोल्हापूर, कोडोली, हलकर्णी, उत्तूर, बहिरेवाडी, हमीदवाडा व कापशी येथे काठाची धोतरे तयार केली जात. हलकर्णी येथे कौशल्यपूर्ण साडी विणकाम केले जाई. इचलकरंजी येथे कुशल विणकर होते.

**घोंगडी विणकाम**

कोल्हापूर राज्यातील शिरोळ, हेरवाड, चिंचणी, नांदणी, रायबाग येथिल धनगर घोंगडी तयार करीत. रायबाग महालामध्ये कौशल्यपूर्ण घोंगडी धनगर विणत. मुलाळ, हारळी, वाघापूर,पट्टणकोडोली व वाशी येथे घोंगडी विणत. पट्टणकोडोली, चिंचली, वाशी येथिल यात्रा ही ठिकाणे घोंगडी बाजारासाठी राज्यात प्रसिद्ध होत्या.

**तेल व्यवसाय –**

कोल्हापूर राज्यात तेल काढण्यासाठी करडई, कोरटे, भुईमुग, अंबाडी, तीळ, जवस, मोहरी यांचा वापर केला जाई. राज्याच्या पश्चिम भागात करंज्याच्या बियांचे व अळते ( सध्याचा हातकणंगले तालुका ) पेठ्यात तंबाखूच्या बियांचे तेल काढत. शेतकरी स्त्रिया एरंडीचे, पिवळया धोत्र्याच्या बियांचे तेल काढत. एरंडीच्या तेलाचा जाळण्यास व रेचक म्हणून उपयोग केला जाई. अंगावर फोड आल्यास त्यावर धोत्र्याचे तेल लावत.[5]

**कागद व्यवसाय –**

कोल्हापूर शहरात कागद तयार करण्याचे चार कारखाने होते. या प्रत्येक कारखान्यावर सहा मजूर काम करत. हा कागद जाडा, खरबरीत पण बळकट व मोहोरदार असा होता. कागद तयार करण्यासाठी लागणारा कच्चा माल बेळगाव, कोगनोळी व इतर ठिकाणाहून आणला जाई. या कागदाशिवाय कोल्हापूरात तीन प्रकारचे सफाईदार कागद तयार केले जात. या चार कारखान्यात वर्षाला ३००० रु. चा कागद तयार केला जाई. कोल्हापूरातच २७०० रु. कागद विकला जात होता. तर ३०० रु . कागद मिरज- सगलीकडे विकला जाई. सन १८५३-५४ मध्ये कोल्हापूर राज्यात कागद तयार करण्याचे १८ करखाने असून त्यात

६६६ कामगार काम करीत. या कागदास दक्षिणी संस्थानात कार्यालयीन कामासाठी चांगली मागणी होती. कोल्हापूर जेलमध्येही कागद तयार करण्याचा एक लहान कारखाना होता. मात्र युरोपियन चांगले व स्वस्त कागद आल्यानंतर कोल्हापुरी कागदाची मागणी कमी झाली होती.

**सुगंधी पदार्थ**

कोल्हापूर राज्यात सुगंधी पदार्थ तयार केले जात. बुक्का, अगरबत्ती, उदेल, दांतवण इ. पदार्थ तयार केले जात. बुक्का तयार करण्यासाठी घोणेसरीची वाळलेली फुले, उद, चंदनी अत्तर, कस्तुरी यांचा वापर केला जाई. अगरबत्त्या तयार करण्यासाठी बाभळीचे कोळसे, कचोरा, तगरीची फुले, नागरमोघा, चंदन व कस्तुरीचा वापर केला जाई. उदाचे व तिळाचे तेल मिसळून उदेल तयार केले जाई. दांतवण तयार करण्यासाठी कात, हिरडे, मोरचुद, बिबे, आवळकाठी, नागकेशर, हिरडा व लवंग या पदार्थांची पूड तयार केली असता दांतवण तयार होई. बुक्का, अगरबत्त्या व दांतवण विकण्याचा. व्यवसाय आत्तार लोक करत.[6]

**दोरखंड व्यवसाय –** कोल्हापूर राज्यात दोरखंड तयार करण्याचा व्यवसाय करवीर, अळते, शिरोळ, पन्हाळा या पेठ्यात मोठ्या प्रमाणवर चालत होता. दोरखंड तयार करणाऱ्यांना नाडे मांग म्हटले जाई. दोरखंड तयार करण्यासाठी अंबाडी, ताग, केकतीच्या बाकाचा उपयोग केला जाई. हा व्यवसाय उन्हाळयात मोठया प्रमाणावर चालत होता. ज्या भागात शेतीला मोटेद्वारे पाणीपुरवठा केला जाई तेथे दोरखंडास चांगली मागणी होती.

**चिरमुरे व्यवसाय –** कोल्हापूर राज्यात नऊ ठिकाणी चिरमुरे तयार केले जात. करवीर पेठ्यात निगवे व शिरसे, भुदरगड पेठ्यात वाळवा, कुंभारवाडी, शेणगाव व निश्नप, कागल जहागिरीत यमगे, बावडा जहागिरीत राशिवडे व इचलकरंजी जहागिरीत आजरा येथे हा व्यवसाय चाले. पण निगवे, वाळवे व यमगे येथेच हा व्यवसाय मोठ्या प्रमाणावर चाले. हा व्यवसाय वर्षातून ९ -१० महिने चाले. सन १८९४ च्या सुमारास राज्यात चिरमुरे तयार करण्याच्या १३९ भट्टया असून ३५९ कामगार काम करत होते.[7]

**गुळ व साखर व्यवसाय –** कोल्हापूर राज्यात गुळ बनविण्याचा व्यवसाय अळते, पन्हाळा पेठ्यात व आजरा महालात चाले. या शिवाय यळगुड, शिरोली व सांगरुळ येथेही गुळ तयार केला जाई. गुळाबरोबरच काकवीही तयार केली जाई. राज्यातून वर्षाला अंदाजे १२९६ खंडी गुळ तयार होत असे. त्यांची अंदाजे किंमत १,२०,५३९ / - रुपये एवढी होती.[8] राज्यात सन १८९३ मध्ये १० ठिकाणी साखर तयार केली जात होती. सुळकूड व रेंदाळ ही दोन ठिकाणे साखरेसाठी प्रसिद्ध होती. शिरोली, सांगरुळ, लिंगनूर येथेही साखर तयार केली जाई. कोल्हापूरी गुळाची निर्यात गुजरात राज्यात होत असे. कोल्हापूरची हवा, पाणी व जमीन उसाच्या लागवडीस योग्य होती. राज्यात तयार झालेला गुळ चवदार व टिकाऊ होता.[9] "थोडक्यात कोल्हापूर राज्यात सन १८८३ ते १८९४ या कालखंडात वरील उद्योगधंदे चालत होते. यातील कांही उद्योगांवर त्यावेळीसुद्धा आयात मालामुळे परिणाम झाल्याचे दिसते. उदा.- बांगडी उद्योग, कापड उद्योग, कागद उद्योगांमध्ये मंदी निर्माण झाली होती. इतर व्यवसाय मात्र चांगले चालत होते. असे दिसते.

**संदर्भ –**

1. Campbell James Gazetteer of the Bombay presidency Vol. - XXIV Kolhapur, 1886
2. मोडक बा. प्र. ( भाषांतरीत ) - कोल्हापूर गॅझेटिअर, सन १८८६ पृ ३०४.
3. Kolhapur State Report on the Industrial survey of the Kolhapur Territory year- 1895 PP - 53 54, 55
4. मोडक बा. प्र. ( भाषांतरीत ) - कोल्हापूर गॅझेटिअर सन १८८६ पृ. ३०८- ३०९
5. Kolhapur State Report on the Industrial survey of the Kolhapur-Territory year -1895 PP-57-61.
6. मोडक बा. प्र. - उपरोक्त पृ-३११-३१४
7. मोडक बा. प्र. - उपरोक्त पृ. - ३१४-३१८
8. Report on the Industrial survey of Kolhapur Territory P - 56
9. Graham D. C. - Statistical Report of the Kolhapur State, Bombay year – 1854 P - 270.
10. भिडे ग. र. , देशपांडे पु. ल. - कोल्हापूर दर्शन, सन १९७९ पृ.- ३६२-३६३